# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

# Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे १९८९ मध्ये स्थापिलेले)**

(Established by Government of Maharashtra in the year 1989)

# व्यवस्थापन मंडळ बैठक

## Board of Management Meeting

## कार्यवृत्त

**Minutes of Meeting**

**बैठक क्रमांक** : 197
(Meeting Number)

**स्थळ(Venue)** : विद्यापीठ मुख्यालय सभागृह,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक ४२२२२२
Administrative Building Meeting Hall
Yashwantrao Chavan Maharashtra Open University,
Nashik, 422 222

**वार व दिनांक** : मंगळवार, दिनांक 31 डिसेंबर 2024
**(Day and Date)** : Tuesday, 31th December 2024

**वेळ** (Time) : सकाळी 11.30 वाजता (11.30 am)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)**

## 197 वी व्यवस्थापन मंडळ बैठक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची 197 वी बैठक (ऑनलाईन व ऑफलाईन) पद्धतीने मंगळवार, दि. 31 डिसेंबर 2024 रोजी दुपारी11.30 वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | अध्यक्ष |
| 02 | मा. डॉ. संजय घनश्याम भावे, मा. कुलगुरू कोकण कृषी विद्यापीठ, दापोली | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 03 | मा. प्रा. वाल्मिक कचरू सरवदे, प्र-कुलगुरू डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजी नगर | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 04 | मा. श्री. नरेंद्र अनंतराव जोशी, अंबेजोगाई | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 05 | मा. प्रा. एन. के. दास, स्कूल ऑफ एज्युकेशन, इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिर्व्हसिटी, नवी दिल्ली | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 06 | मा.डॉ. संजीवनी महाले, संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सदस्य |
| 07 | मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण आणि प्रशिक्षण यांचे प्रतिनिधी श्री. अनिल गावित नाशिक | | सदस्य |
| 08 | मा. श्री. भटुप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | निमंत्रित सदस्य |
| 09 | मा. डॉ. गोविंद कतलाकुटे, वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | निमंत्रित सदस्य |
| 10 | श्री. दिलीप भरड, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सचिव |

पुढील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, मा. प्र-कुलगुरू | सदस्य |
| 02 | मा. सचिव, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 03 | मा. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 04 | मा. सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 05 | मा. संचालक, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 06 | मा. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांचे प्रतिनिधी श्री. गर्जे, नाशिक | सदस्य |

| अनु.क्रमांक<br>Subject No. | | तपशील<br>Details |
|---|---|---|
| 197.1 | 197.1.1 | **स्वागत : मा. व्यवस्थापन मंडळाचे सदस्य सचिव श्री. दिलीप भरड यांनी ऑफलाईन तसेच ऑनलाईन पद्धतीने उपस्थित सर्व सदस्यांचे शब्दसुमनांनी स्वागत केले.** |
| | | मा. कुलगुरू सरांनी विद्यापीठाच्या प्रगतीबाबत थोडक्यात माहिती दिली. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंग यांनी विद्यापीठाची प्रगती पाहून विद्यापीठाला सदिच्छा भेट देण्याचा मानस व्यक्त केला. त्यानुसार दि. 03-जानेवारी-2025 रोजी ते विद्यापीठास भेट देणार आहेत.विद्यापीठाने कॉमन वेल्थ ऑफ लर्निंग यांचे सहाय्याने शेतकऱ्यांसाठी कृत्रीम बुद्धिमत्ता व साक्षरता हा शिक्षणक्रम विकसित केला. त्याला राज्यातून 2000 शेतकऱ्यांनी प्रवेश घेतला आहे.<br>विद्यापीठात विद्यार्थी वेगवेगळ्या कारणांसाठी येत असतात. विद्यापीठ हे नाशिक शहरापासून दूर आहे. त्यांच्या रहाण्याची व्यवस्था विद्यापीठात नाही. तसेच विद्यापीठात नवीन विद्याशाखांची निर्मिती झाली आहे. सध्या विद्यापीठातील पायाभूत सुविधा अपूर्ण आहेत. त्यामुळे विद्यापीठात विद्यार्थ्यांसाठी येत्या 2-3 वर्षांत वसतीगृह, मा. कुलगुरू निवासस्थान बांधकामाचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.<br>या वाटचालीची माहिती ऐकून उपस्थित सन्माननीय सदस्यांनी मा. कुलगुरूंचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. |
| 197.2 | 197.2.1 | **दिनांक 8 ऑक्टोबर 2024 रोजी झालेल्या 196 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** दिनांक 8 ऑक्टोबर 2024 रोजी झालेल्या 196व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त सचिव श्री. भरड यांनी वाचून दाखविले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 197.2.2 | **दिनांक 8 ऑक्टोबर 2024 रोजी झालेल्या 196 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** दिनांक 8 ऑक्टोबर 2024 रोजी झालेल्या 196व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवालाचे वाचन व्यवस्थापन मंडळाचे सचिव श्री. भरड यांनी केले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 197.3 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 197.3.1<br>आस्थापना कक्ष | **विद्यापीठातील गट-अ व गट-ब मधील नियमित पदोन्नतीबाबत, डॉ. नितीन जयसिंग ठोके, यांच्या प्रमुख/वरिष्ठ शास्त्रज्ञ या पदावरील परिविक्षा कालावधीबाबत...**<br>**टिपणी** – विद्यापीठातील गट-अ मधील उपकुलसचिव, सहायक कुलसचिव, व्हिडिओ एडिटर व गट-ब मधील कक्ष अधिकारी या पदांवरील पदोन्नतीच्या रिक्त पदांवर नियमित पदोन्नती करण्यास तसेच सेवानिवृत्ती किंवा पदोन्नतीमुळे रिक्त होणाऱ्या पदांवर प्रत्यक्ष पद रिक्त झाल्यानंतर पदोन्नती करण्यासंदर्भात पदोन्नती समितीची बैठक दि. 01-12-2024 रोजी आयोजित करण्यात आली होती.<br>तसेच कृषी विज्ञान केंद्रातील डॉ. नितीन जयसिंग ठोके, प्रमुख/वरिष्ठ शास्त्रज्ञ यांनी MSCITची अर्हता सहा महिन्यात पूर्ण करून प्रशासनास सादर करण्याच्या अटीवर सेवा कायमीकरण करण्यास समितीने एकमताने शिफारस केलेली आहे. सदर शिफारशी कार्योत्तर मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन मंडळासमोर सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** पदोन्नती समितीने सादर केलेल्या शिफारशीस मा. व्यवस्थापन मंडळाने सर्वानुमते कार्योत्तर मान्यता दिली. |

| | | |
|---|---|---|
| | 197.3.2<br>आस्थापना कक्ष | **विद्यापीठ कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेल्या अधिसूचनेनुसार सार्वजनिक सुट्ट्या लागू करणेबाबत...**<br>**टिपणी** – महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभाग यांच्या अधिसूचनेनुसार (असाधारण क्रमांक 144 दिनांक 04 डिसेंबर, 2024) राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांसाठी सन 2025 या वर्षाकरिता सार्वजनिक सुट्ट्या जाहीर करण्यात आलेल्या आहेत. सदरच्या सुट्ट्या विद्यापीठास लागू करण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभाग यांच्या अधिसूचनेनुसार (असाधारण क्रमांक 144 दिनांक 04 डिसेंबर, 2024) राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांसाठी सन 2025 या वर्षाकरिता सार्वजनिक सुट्ट्या विद्यापीठास लागू करण्यास मा. व्यवस्थापन मंडळाने सर्वानुमते मान्यता दिली. |
| | 197.3.3<br>सेवासुविधा कक्ष | **ठेकेदारामार्फत दैनंदिन वेतनावर पुरविण्यात येणाऱ्या मनुष्यबळाच्या मुदतवाढ देण्यास व सध्या विद्यापीठात दैनंदिन वेतनावर/एकत्रित वेतनावर, ठेकेदारामार्फत कार्यरत असलेले कुशल/अकुशल कर्मचाऱ्यांना सेवा खंड देण्यास मान्यता मिळणेबाबत..**<br>**टिपणी** – विद्यापीठाचे विभागीय केंद्र व मुख्यालयातील विभाग, केंद्र, कक्षांमध्ये कुशल 125, अकुशल 118 व एकत्रित वेतनावर 51 असे एकूण 294 मनुष्यबळ मे. यशस्वी ॲकॅडमी फॉर स्किल्स या कंत्राटदारामार्फत कार्यरत आहे.<br>1. सध्या दैनंदिन वतनावर/एकत्रित वेतनावर, ठेकेदारामार्फत कार्यरत असलेले कुशल/अकुशल (सर्व) कर्मचारी यांना बऱ्याच वर्षापासून सेवा खंड(ब्रेक) देण्यात आलेला नाही, याबाबतचा प्रस्ताव कार्योत्तर मान्यतेस्तव मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर....<br>2. दैनंदिन वेतनावर आवश्यक असलेले 294 मनुष्यबळ (कमी/अधिक) संख्येस 1 जानेवारी 2025 ते 30 जुन 2025 या सहा महिन्यांकरिता मुदतवाढ मिळणेसाठीचा विषय कार्योत्तर मान्यतेस्तव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर ...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** दैनंदिन वेतनावर/एकत्रित वेतनावर, ठेकेदारामार्फत कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवाखंड देण्याच्या प्रस्तावास मा. व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिली. दैनंदिन वेतनावर आवश्यक असलेले 294 मनुष्यबळ (कमी/अधिक) संख्येस 1 जानेवारी 2025 ते 30 जुन 2025 या सहा महिन्यांकरिता मुदतवाढ देण्यासाठीच्या प्रस्तावास मा. व्यवस्थापन मंडळाने कार्योत्तर मान्यता दिलेली आहे. |
| | 197.3.4<br>सभा व दप्तर कक्ष | **संचालक, अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र यांच्या विद्याशाखा परिषदेत समावेशाबाबत...**<br>**टिपणी** – अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्राचे संचालक हे पद कार्यालयीन आदेश क्र. YCMOU/VC/777 दि. 04.02.2021 नुसार विद्याशाखा परिषद, विद्वत परिषद आणि नियोजन मंडळ यांचेमध्ये निमंत्रित सदस्य म्हणून आमंत्रित करण्यात येत आहे. संचालक, अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र यांची विद्याशाखा परिषदेत समावेश करण्याकरिता परिनियमात दुरूस्ती करणेकरिता मा. व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर ...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** विद्यापीठाच्या गरजेनुसार संचालक, अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र यांचा समावेश विद्याशाखा परिषदेत करण्याचा विषयाचा परिनियम बनवून कायमस्वरुपी मान्यता घ्यावी या सूचनेसह मा. व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिली. |
| | 197.3.5<br>विद्यार्थी सेवा विभाग | **अहिल्यानगर (अहमदनगर ) जिल्हा हा पुणे विभागीय केंद्रात वर्ग करणेबाबत...**<br>**टिपणी** - अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यासाठी असलेले सर्व शासकीय कार्यालय पुण्यात आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्हा समाविष्ठ आहे. अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्ह्यातील सर्व महाविद्यालये ही पुणे जिल्ह्यास जवळ आहे. तसेच पुणे विभागीय केंद्रामध्ये फक्त तीनच जिल्ह्याचा समावेश आहे. त्यामुळे अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्हा हा पुणे विभागीय केंद्रात वर्ग केल्यास शैक्षणिक व प्रशासकीय दृष्ट्या योग्य होईल व विभागीय केंद्रांच्या जिल्हा विभागणीमध्ये समतोल राखता येईल. तरी अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्हा हा पुणे विभागीय केंद्रात वर्ग करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** अहिल्यानगर (अहमदनगर) जिल्हा हा नाशिक विभागाशी संलग्न होता. परंतु नाशिक विभागाची व्याप्ती नाशिकसह उत्तरमहाराष्ट्राइतकी मोठी आहे. तसेच अहिल्यानगर (अहमदनगर) पुण्याच्या जवळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांच्या कार्यक्षेत्रात येत असल्याने प्रशासकीयदृष्ट्या सोयीचे होणार आहे. अहिल्यानगर पुणे विभागात वर्ग करण्यास मा. व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिली. |

197.3.6 सभा व दप्पर कक्ष

**विद्यापीठाने खालीलप्रमाणे विविध संस्थांशी विद्यापीठाच्या विहित कार्यपद्धतीनुसार 2024 मध्ये केलेले सामंजस्यकरार मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेसाठी सादर ...**

| क्र. | संस्थेचे नाव | कराराचा तपशील |
|---|---|---|
| 1 | Commonwealth of Learning – Commonwealth Educational Media Centre for ASIA (COL-CEMCA) and MKCL, Pune | 1. To develop and share educational media resources as well as provide training and capacity-building programs for educators and proctitioners in Open, Distance and Online Learning.<br>2. To use all available Open Educational Resources and their own material to develop awareness programmes as well as training material<br>3. To engage the pariticipants and raise awareness about AI and the emerging connection to their life and to build clarity and confidence in learners in using and teracting with AI.<br>4. To hold joint conferences, seminars, and workshop and to impart necessary skills and knowledge on the use of Artificial Intelligence in various domainsof work and inculate a practice of using AI safely, ethically and responsibly<br>5. While the above objectives are generic, it must be stated the COL-CEMCA is developing a curriculum for spreading Artificial Intelligence (AI) Literacy among Informal Sector Workers in collaboration with Global Partnership on Artificial Intelligence (GPAI). This Curriculum and the courseware are aimed at workers of the small, mini and micro-enterprises and the informal sector to create awareness around AI. |
| 2 | BVG India Limited | To establish, organize and implement various government schemes for intership/ apprenticeship/ OJT for UG and PG bonafide and passed out learners, as per the UGC curriculum |
| 3 | Sanjiwani College of Engineering, Kopargaon | Certificate and Diploma programmes in Data Science, AI and ML |
| 4 | Maharshi Karve Stree Shikshan Santha's Academy of Information Technology Centre for Data Science, Machine Learning and AI | The Collaboration aims to enhance the student's creativity and develop 21st-century digital skills to increase their employability by providing novel and specialized diploma courses in Data Science, Machine Learning, and Artificial Intelligence. |
| 5 | Maharashtra Prison Department | Development and delivery of B.A., B.Com. and Yoga programmes.<br>Designing short-term vocational courses relevant and useful to prisoners<br>Offer the programmes to the prisoners without charging any fees. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 6 | CYECOPS LLP. BANER, PUNE | Diploma in Cyber Crime Investigation, Certificate in Cyber Acts<br>Certificate in CDR Analysis, Certificate in Mobile and Cyber Forensics. |
| | | 7 | Skill factory Learning Pvt. Ltd. | Cyber Security Courses – credit based courses for UG & PG based on UGC curriculum |
| | | 8 | Maharshi Karve Stree Shikshan Santhas | Academy of Information Technology centre for Data Science |
| | | 09 | Sanjivani College of Engineering, Kopargaon | Dip. In Data Science with AI & ML programme |

**व्यवस्थापन मंडळ ठराव** : विद्यापीठाने वरील विविध संस्थासोबत केलेल्या सामंजस्य करारांना तसेच दि. 30-डिसेंबर-2024 रोजी झालेल्या Special School आणि NAB या संस्थांशी झालेल्या सामंजस्य करारांना मान्यता दिली.

| | | |
|---|---|---|
| | 197.3.7<br>आस्थापना कक्ष | **संगणक अर्हता व नियुक्तीतील अनियमितता बाबतचे हमीपत्राच्या मंजुरीबाबत...**<br>**टिपणी** – दि. 02.09.2024 रोजी झालेल्या व्यवस्थापन मंडळ सभेत संगणक अर्हता व नियुक्तीतील अनियमितता (वयोधिक्य, शैक्षणिक अर्हता, नेमणूक कार्यपद्धती) बाबत ठराव क्र. 195.3.7 आणि 195.3.9 नुसार घेतलेल्या निर्णयानुसार दोन वेगवेगळे हमीपत्र नमुना तयार करण्यात आले आहेत. दोनही हमीपत्रांचा नमुना मा. व्यवस्थापन मंडळासमोर कार्योत्तर मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : संगणक अर्हता व नियुक्तीतील अनियमितता बाबतच्या हमीपत्रांना मा. व्यवस्थापन मंडळाने कार्योत्तर मान्यता दिली. |
| | 197.3.8<br>वित्त अधिकारी | **विषय – वित्त समितीच्या रिक्त झालेल्या सदस्यांच्या नामनिर्देशनाबाबत...**<br>**टिपणी** - विद्यापीठ परिनियम क्र. 1* (1 of 1991) (see section 19 of the Act) क्र. 3(iii) व (iv) नुसार व्यवस्थापन मंडळाद्वारे व्यवस्थापन मंडळाच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेल्या 2 सदस्यांपैकी सौ. सरोज अहिरे माननीय आमदार यांची डिसेंबर 2024 मध्ये व श्री. अनिल कुलकर्णी यांची 20 सप्टेंबर 2024 रोजी सदस्य म्हणून नियुक्तीचा कालावधी संपलेला आहे. तरी व्यवस्थापन मंडळाने नियुक्त केलेले व्यवस्थापन मंडळाच्या दोन सदस्यांचे नामनिर्देशन करून मिळणेसाठीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर ...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : उपरोक्त विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या पुढील बैठकीत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. |
| | 197.3.9<br>अंतर्गत गुणपत्ता आश्वासन केंद्र | **विद्यापीठाचा 34 वा वार्षिक अहवाल 2023-24 मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या पत्रान्वये दरवर्षी विद्यापीठांचा वार्षिक अहवाल विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येतात. विद्यापीठाचा 34 वा वार्षिक अहवाल 2023-24 मा. कुलगुरू तथा मा. अध्यक्ष व्यवस्थापन मंडळ यांनी प्रसिद्ध करण्यास मान्यता दिलेली आहे. सदर अहवाल मा. व्यवस्थापन मंडळाच्या कार्योत्तर मान्यतेस्तव सादर....<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : विद्यापीठाचा 34वा वार्षिक अहवाल मा. व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मा. कुलगुरूंनी मान्य केला. सदर अहवाल प्रकाशित करण्यात आला. तसेच नागपूर येथील अधिवेशनातही हा अहवाल विधान मंडळाच्या पटलावर ठेवण्यात आला ही माहिती सचिव श्री. भरड यांनी दिली. त्यामुळे मा. कुलगुरूंचे सर्व सदस्यांनी अभिनंदन केले आणि 34व्या वार्षिक अहवाल 2023-24 ला मा. व्यवस्थापन मंडळाने कार्योत्तर मान्यता दिली. |
| | 197.3.10<br>आस्थापना कक्ष | **श्री. सचिन कैलास मोहिते- करारावरील संयोजक (प्रशासकीय) यांची करारावरील मुदतवाढ मा. व्यवस्थापन मंडळाच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर...**<br>**टिपणी** - विद्यापीठ कायदा XX, 1989 मधील दुसरी अनुसूची, परिनियम 2 मधील 9 सी अंतर्गत तरतुदीनुसार मा. कुलगुरूंना कमीत कमी सहा महिने आणि जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत नियुक्त्यांचे अधिकार आहेत. (सोबत कायद्याची प्रत जोडलेली आहे.) |

1. **विद्यापीठ परिनियम क्र.** 11 **(2 of 1993) अन्वये** एकूण 3 वर्ष कालावधीसाठी नियुक्ती करण्याची तरतूद आहे. त्यात मा. कुलगुरूंच्या अखत्यारीत 2 वर्षे व एक वर्ष व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने नियुक्ती करता येते.

| अ. क्र | नाव व पद | नेमणुकीचा कालावधी | वर्षे | मानधन |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्री. सचिन कैलास मोहिते** करारावरील संयोजक (प्रशासकीय) परीक्षा कक्ष | दि. 05.04.2021 ते दि. 04.10.2021 | 6 महिने | रू. 25000/- |
| | | दि. 13.10.2021 ते दि. 12.04.2022 | 6 महिने | |
| | | **एकूण कालावधी कायदा 20 (9 C) नुसार** | **1 वर्ष** | |
| | | दि. 23.11.2022 ते दि. 22.05.2023 | 6 महिने | |
| | | दि. 29.05.2023 ते दि. 28.11.2023 | 6 महिने | |
| | | दि. 06.12.2023 ते दि. 05.06.2024 | 6 महिने | |
| | | दि. 22.06.2024 ते दि. 21.12.2024 | 6 महिने | |
| | | **एकूण कालावधी 11 (2 of 1993) नुसार** | **2 वर्ष** | |

उपरोक्त तक्त्यातील क्र. 1 चे संयोजक (प्रशासकीय) - श्री. सचिन कैलास मोहिते यांचा विद्यापीठ कायदा 20 (9 सी) नुसार 1 वर्षे कालावधी संपुष्टात आलेला आहे. तसेच विद्यापीठ परिनियम 11 (2 of 1993) नुसार 2 वर्षे कालावधी संपुष्टात आलेला आहे. त्यांना पुन्हा मुदतवाढ द्यावयाची असल्यास मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने देता येऊ शकते. श्री. सचिन मोहिते यांचा मुदतवाढीचा अर्ज विभागप्रमुखांमार्फत पाठविण्यात आलेला आहे.

श्री. सचिन कैलास मोहिते यांच्या मा. व्यवस्थापन मंडळाच्या अखत्यारीतील 1 वर्ष (6 महिने - 6 महिने) मुदतवाढीस मा. कुलगुरू यांनी मा. व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता दिलेली असून सदर विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत कार्यात्तर मान्यतेसाठी सादर...

**व्यवस्थापन मंडळ ठराव :** सदर बाब प्रशासकीय असून त्यास मा. व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मा. कुलगुरूंनी मान्यता दिली. मा. कुलगुरुंनी दिलेल्या मान्यतेस मा. व्यवस्थापन मंडळाने कार्योत्तर मान्यता दिली.

197.3.11 सभा व दप्तर कक्ष

**विद्यापीठ कायदा, परिनियम व अध्यादेश सुधारणा उपसमितीच्या दि. 25.11.2024 च्या बैठकीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळाच्या अवलोकनार्थ आणि मान्यतेस्तव सादर...**

**टिपणी** — दि. 25.11.2024 रोजी विद्यापीठ कायदा, परिनियम व अध्यादेश सुधारणा उपसमितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या समितीच्या बैठकीतील विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर....

| परिनियम क्रमांक | पूर्वीचा परिनियम | परिनियमातील सुधारणा |
|---|---|---|
| **विद्वत परिषद परिनियम क्र. 5 (Statute No. 5 * 3 of 1992) (See Statute 8 (a) of the Act)** | | |
| १.१. अनुक्रमांक ३ मधील उपकलम (ii) | "(ii) Executive Directors (not more than three) Nominated by Board of Management" | "(ii) "Pro-Vice Chancellor असे असावे. |
| १.२. अनुक्रमांक ३ मधील उपकलम (iii) | "(iii) Directors of the Schools of Studies (not more than seven) nominated by Board of Management" | "(iii) Directors of the Schools of Studies nominated by Board of Management" असे असावे. |
| १.३. अनुक्रमांक ३ मधील उपकलम (v) | "(v) Librarian / Professor — Incharge of Library | "(v) Librarian / Professor / Director — Incharge of Knowledge Resource Center" असे असावे. |
| १.४. अनुक्रमांक ४ | Provided that the total membership of the Academic Council shall not exceed 30 | Provided that the total membership of the Academic Council shall not exceed 30 रद्द करावा आणि उर्वरित अनुक्रमांकांमध्ये पुनर्गणना करून योग्य बदल (renumbered) करण्यात यावा. |

| | | |
|---|---|---|
| | | [Serial number 4 be deleted and the remaining parts be accordingly renumbered]. |
| १.५. अनुक्रमांक ६ | "10 members of the Academic Council shall form the quorum for a meeting." | "One thirds of the total number of members shall form the quorum for a meeting" असे करावे. |
| (1) **विद्याशाखा परिषद – परिनियम क्र. 6 (Statute No. 6 * 4 of 1992) (See sub-section 5 of Section 15 of the Act)** | | |
| 3. The University shall have the following Schools of Studies, namely : | i. School of Humanities and Social Sciences;<br>ii. School of Commerce and Management;<br>iii. School of Education;<br>iv. School of Science & Technology;<br>v. School of Agriculture;<br>vi. School of Computer Science;<br>vii. School of Continuing Education | i. School of Humanities and Social Sciences;<br>ii. School of Commerce and Management;<br>iii. School of Education;<br>iv. School of Science & Technology;<br>v. School of Agriculture;<br>vi. School of Computer Science;<br>vii. School of Continuing Education;<br>viii. School of Health Science;<br>ix. School of Online Learning;<br>x. School of Multidisciplinary Studies;<br>xi. School of Language, Literature & Cultural Studies;<br>xii. School of Vocational Studies skill Development;<br>xiii. School of Development Studies |
| 4. (a) Executive Director nominated by the Vice-Chancellor, Chairman | Executive Director nominated by the Vice-Chancellor, Chairman; असे नमूद आहे. | Executive Director हे पद कायद्यातील कलम ९ मध्ये नमूद "Officers of the University" मध्ये नमूद नसल्याने ही तरतूद कायद्याशी विसंगत आहे. सबब ही तरतूद रद्द करावी आणि उर्वरित अनुक्रमांकांमध्ये पुनर्गणना करून योग्य बदल (renumbered) करण्यात यावा. |
| 4. (b) Director of the School, Vice-Chairman | Director of the School, Vice-Chairman | वरील (a) हा मुद्दा रद्द केल्याने (b) चा नंबर दुरुस्त करून (a) करण्यात यावा. |

| | | |
|---|---|---|
| | | (a) Director of the School, Chairman करण्याता यावा. |
| 4. (d) Reader of the School | At least four Readers / Lectures assigned to be School, nominated by the Vice-Chancellor | At least four Associate Professor / Assistant Professor assigned to be School, nominated by the Vice-Chancellor असे असावे. |
| 4. (e) Not more than four Professors / Readers / Lecturers from disciplines not assigned to the School, nominated by the Vice-Chancellor; | Not more than four Professors / Readers / Lecturers from disciplines not assigned to the School, nominated by the Vice-Chancellor; | Not more than four **Professors / Associate Professor / Assistant Professor** from disciplines not assigned to the School, nominated by the Vice-Chancellor असे असावे. |
| 6. (xii) To delegation to the Executive Director | (xii) To delegate to the Executive Director and / or the Director of the School or to any other member of the Council or to a Committee such general or specific power, as may be decided upon by the School, from time to time. | (xii) To delegate to the **Director of the School or to any other member of the Council** or to a Committee such general or specific power, as may be decided upon by the School, from time to time. असे असावे. |
| सर्व विद्याशाखांच्या विद्याशाखा परिषदेवर अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्राचे संचालक सदस्य म्हणून असावेत. | याचा उल्लेख कायद्यात / परिनियमात यापूर्वी केलेला नव्हता. | 2021 मध्ये तत्कालीन कुलगुरू यांनी NAAC Acrediation साठी ऑफीस ऑर्डर काढून सर्व विद्याशाखांना अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्राच्या संचालकांना विद्याशाखा परिषदेच्या बैठकीत निमंत्रित सदस्य म्हणून बोलावण्यात यावे असे कळविले होते. तेव्हापासून प्रत्येक विद्याशाखेच्या प्रत्येक बैठकीसाठी संचालक अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्राच्या संचालकांना सदस्य म्हणून बोलावण्यात येत आहे.<br>परिनियमात यांचा कायम निमंत्रित सदस्य म्हणून समावेश करावयाचा असल्यास परिनियमातील समावेशासाठी अग्रेशीत |
| नवीन विद्याशाखांसाठी आवश्यक मनुष्यबळाविषयीचा Staffing Pattern | Statute No. 6 * (4 of 1992) (See Sub-section 5 of Section 15 of the Act) नुसार संचालक तथा प्रोफेसर – 01<br>सहयोगी प्राध्यापक – | नवीन विद्याशाखा, केंद्रे यांसाठी Staffing Pattern ठरवितांना संबंधित विद्याशाखांसाठी केलेले आर्थिक नियोजन, विद्याशाखेचा विकास आराखडा, विद्याशाखेची व्याप्ती/विस्तार, |

| | | |
|---|---|---|
| | सहायक प्राध्यापक –<br>प्रशासकीय कर्मचारी - | पदांची संरचना, कार्यभार, विद्याशाखांमार्फत राबविण्यात येणारे नियोजित शिक्षणक्रम, त्यांसाठी आवश्यक मनुष्यबळ यांचा तपशील असणे गरजेचे आहे. तसेच किती पदे कायम स्वरुपी असावीत, परिनियम क्र ११ प्रमाणे नियुक्त (Fixed Tenure Contract Basis) किती सेवकांच्या मार्फत कोणते कामकाज केले जातील. असा सर्व तपशील या समितीपुढे चर्चेसाठी आणि परिनियमांच्या मसुदा तयार करण्यासाठी आवश्यक आहे असे सर्वानुमते सुचविण्यात आले. |
| विद्यापीठ कायदा क्र. XX of 1989 मधील Second Schedule (First Statutes) पृष्ठ क्र. 19 | 3. The Director – 1. Every Director shall be appointed by the Board of Management on the recommendations of (1) The Vice Chancellor (if the candidate to be appointed is already a teacher of the university) | परिनियमात सुधारणा करण्याची गरज नाही. |

**व्यवस्थापन मंडळ ठराव :** विद्यापीठ कायदा, परिनियम व अध्यादेश उपसमितीने सादर केलेल्या इतिवृत्तावर पुढील विहित कार्यवाही करण्याच्या सुचनेसह मा. व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिली.

| | | |
|---|---|---|
| | 197.3.12<br>अंतर्गत गुणवत्ता केंद्र | **राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेचा (NAAC) वार्षिक गुणवत्ता हमी अहवाल मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – विद्यापीठाचा राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेचा (NAAC) चा वार्षिक गुणवत्ता हमी अहवाल नॅकच्या वेब पोर्टलवर जाहीर करण्यास मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** विद्यापीठाचा राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेचा (NAAC) चा वार्षिक गुणवत्ता हमी अहवाल नॅकच्या वेब पोर्टलवर जाहीर करण्यास मा. व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिली. |
| 197.4 | | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय** |
| | 197.4.1<br>ऑनलाईन लर्निंग विद्याशाखा | **'School of Online Learning' या विद्याशाखेचे नामाभिधान 'School of Online Education' असे करण्यास मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – मा. व्यवस्थापन मंडळ सभा क्र. 188 दि. 20 जून, 2023 मध्ये झालेल्या ठराव क्र. 188.3.16 अन्वये School of Online Learning या विद्याशाखेची स्थापना करण्यात आली. परंतु विद्याशाखेच्या नामाभिधानामुळे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 202 नुसार शिक्षण पद्धतीत झालेले आणि येऊ घातलेले आमुलाग्र बदल लक्षात घेता, मुक्त, दुरस्थ व Online Learning या नामाभिधानामुळे येणाऱ्या मर्यादा दूर करण्यासाठी 'School of Online Education' असे नामाभिधान करण्यास मा. विद्वत परिषदेच्या वतीने मा. कुलगुरुंनी मान्यता दिलेली आहे. सदर विषय मा. विद्वत परिषदेच्या येणाऱ्या बैठकीत कार्योत्तर मान्यतेसाठी ठेवण्यात येईल. तत्पुरी मा. विद्वत परिषदेच्या वतीने मा. व्यवस्थापन मंडलाच्या बैठकीत मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** 'School of Online Learning' मधील 'Learning' या शब्दामुळे अनेक मर्यादा येतात याकडे मा. कुलगुरूंनी लक्ष वेधले. या मर्यादा दूर करण्यासाठी 'School of Online Learning' ऐवजी 'School of Online Education' असे नामाभिधान करण्याविषयी प्रस्तावित केले. यावर 'Online' या शब्दाऐवजी |

| | |
|---|---|
| | दुसरा पर्यायी शब्द शोधण्याची सुचना मा. सदस्य डॉ. सरवदे सरांनी केली. त्यावर मा. कुलगुरूंनी त्यावर दुसरा पर्यायी शब्द शोधू असे विशद केले. 'School of Online Learning' ऐवजी 'School of Online Education' असे करण्यास मा. व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिली. |
| 197.4.2<br>सभा व दप्तर कक्ष | **विद्वत परिषदेवर तीन संचालकांची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव ...**<br>**टिपणी** – विद्वत परिषदेवर परिनियम क्रमांक 5(3)/1992) See Statute 8(a) of the Act मधील 3(vi) अन्वये Not more than 3 Directors of the Centers/Divisions other than Heads of the Schools of Studies to be nominated by the Board of Management on the recommendations of the Vice-Chancellor; अन्वये पुढील 3 संचालकांची नियुक्ती करण्यात आली होती.<br>1. संचालक, शेक्षणिक सेवा विभाग (सुधारित संचालक, बहुविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा)<br>2. संचालक, विद्यार्थी सेवा विभाग<br>3. संचालक, विद्यार्थी मूल्यमापन विभाग<br>सदर परिनियमान्वये विद्वत परिषदेसाठी 3 संचालकांचे (विद्याशाखा संचालकांव्यतिरिक्त) नामनिर्देशन करून मिळण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर ...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** विद्वत परिषदेवर परिनियम क्रमांक 5(3)/1992) See Statute 8(a) of the Act मधील 3(vi) अन्वये Not more than 3 Directors of the Centers/Divisions other than Heads of the Schools of Studies to be nominated by the Board of Management on the recommendations of the Vice-Chancellor; अन्वये केलेल्या सदस्य म्हणून नियुक्ती केलेल्या संचालकांचा कार्यकाळ संपुष्टात आल्याने नवीन संचालकांची नेमणूक करण्यासाठी मा. कुलगुरूंनी पुढील संचालकांचे नामनिर्देशन केले.<br>1. प्रा. जयदिप निकम<br>2. प्रा. संजिवनी महाले<br>3. प्रा. सुरेंद्र पाटोळे<br>मा. कुलगुरूंनी सदस्य नामनिर्देशनासाठी सुचविलेल्या संचालकांना विद्वत परिषदेवर सदस्य म्हणून नामनिर्देशन करण्यास मा. व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिली. |
| 197.4.3<br>वित्त विभाग | **वित्त समिती सभा क्र. 17 दिनांक 28-12-2024 रोजीच्या सभेचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** – मा. वित्त समितीची क्र. 17 वी सभा दि. 28-12-2024 रोजी मुख्यालयात आयोजित करण्यात आली होती. सदर समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** : मा. वित्त समितीची सभा क्र. 17. दि. 28-12-2024 रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वित्त अधिकारी यांनी सभेपुढे मांडले. त्यातील ठळक मुद्द्यांची माहिती मा. वित्त अधिकारी यांनी सादर केली. सदर बैठकीतील सर्व विषयांवर चर्चा होऊन मान्य करण्यात आले तसेच खालील विषयांच्या बाबतीत सविस्तर चर्चा करण्यात आली.<br>01. वित्त समिती सभा विषय क्र. 03 - कर्मचारी कल्याण निधी योजना तयार करण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीमार्फत प्राप्त अहवालावर सविस्तर चर्चा करण्यात आली. कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी सदर योजना असल्याने कर्मचाऱ्यांच्या अंशदानाबरोबर विद्यापीठाचे अंशदान सदर योजनेत समाविष्ट करण्यास मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली.<br>02. वित्त समिती सभा विषय क्र. 07 - कल्याण विभागीय केंद्राकडे प्रलंबित असलेल्या अग्रीमाच्या केलेल्या समायोजनास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. उर्वरित असमायोजित अग्रीम रक्कम रु. 72,96,128/- वसुली होणे अशक्य आहे. कारण सन 2012-13 ते 2013-14 या आर्थिक वर्षात त्याठिकाणी असलेले संचालक यांचे निधन झालेले असून सदर कल्याण विभागीय केंद्र गेल्या 10 वर्षापासून बंद करुन त्याचा कारभार मुंबई विभागामार्फत चालतो. मुंबई विभागीय केंद्राकडे सदर असमायोजित देयके उपलब्ध नाहीत त्यावेळी तेथे काम करणारे श्री टी. के. सोनवणे हे एकमेव कर्मचारी जे की, सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांनी वरील समायोजित देयके सादर करुन समायोजन केलेले आहे. मात्र उर्वरित देयके त्यांच्याकडेही उपलब्ध नाहीत.<br>उपरोक्तप्रमाणे असलेल्या अग्रिम समायोजनाच्या अडचणी लक्षात घेऊन त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती सदर प्रलंबित अग्रिम निर्लेखित करण्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | | सदर मान्यता प्रदान करण्याचे अधिकार मा. व्यवस्थापन मंडळाला असल्याने अंतिमत: इतर कोणताही उपाय दिसत नसल्याने सदर अग्रिम रु. 72,96,128/- विद्यापीठाच्या अग्रिम लेख्यातून निर्लेखित करण्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.<br>03. वित्त समिती विषय क्र. 13 — वित्त समितीने या विषयाच्या अनुषंगाने घेतलेला निर्णय अंतिम केला. कारण एकच व्यक्ती एकाच वेळी दोन ठिकाणी काम करून दोन्ही ठिकाणचे मानधन घेऊ शकत नाही व विद्यापीठाचे संगणक प्रणाली याला स्विकारत नसल्याने जरी, प्रस्तावात परीक्षा विभागाने प्रस्तावित केल्यानुसार एका व्यक्तीला दोन ठिकाणचे मानधन देता येणार नाही असे स्पष्टपणे सर्वानुमते ठरले.<br>04. वित्त समिती एनवेळचा विषय क्र. 02 — विद्यापीठाची TA/DA, सर्व प्रकारचे मानधने, शुल्क इत्यादी बाबत सुधारणा समिती नेमलेली असून त्यांचा अंतिम अहवाल येऊन त्याचे रुपांतर परिनियमात होण्याकरिता वेळ लागणार आहे. मात्र दि. 7 जानेवारी, 2025 पासून विद्यापीठाच्या परीक्षा सुरु होणार असून त्याकरिता सुधारित मानधनाचे दर देण्याबाबत सर्वांचे एकमत झाले. तसेच परीक्षा विभागाने परीक्षा केंद्रांना मेलद्वारे परीक्षा आयोजनाच्या संदर्भाने असलेले विविध सुधारित दर कळवावेत. जेणेकरून, परीक्षा आयोजित करणाऱ्या केंद्रास वाढीव सुधारित दरानुसार देयके अदायगी करता येतील. सविस्तर परिपत्रक समितीच्या अहवालानंतर व मा. व्यवस्थापन मंडळाने त्यास मान्यता प्रदान करून परिनियम तयार झाल्यानंतर प्रत्यक्षात लागु करण्यात येतील. |
| | 197.4.4<br>विद्यार्थी सेवा विभाग | **यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे जिल्हा केंद्र पालघर येथे सुरू करण्यास मान्यता मिळणेबाबत...**<br>**टिपणी** — पालघर हा आदिवासी जिल्हा असून अतिदुर्गम भाग आहे. तसेच मोठ्या प्रमाणात सागरी किनारा या जिल्ह्याला लाभला आहे. पालघरमध्ये पर्यटन, कृषी, मासेमारी, दुग्ध व्यवसाय तसेच भोईसर येथे आशियाखंडातील सर्वात मोठी औद्योगिक वसाहत आहे. या औद्योगिक वसाहतीत मोठ्या प्रमाणात कुशल कामगाराची अधिकारी, कर्मचारी यांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास मोठी संधी आहे. पालघर आदिवासी जिल्हा असल्याने अतिदुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र विद्यापीठ हे वंचित आणि दुर्लक्षित घटकाला उच्च शिक्षणाची संधी व 250 पेक्षा जास्त प्रमाणपत्र शिक्षणक्रम उपलब्ध करून दिलेले आहे. पालघर जिल्ह्यातील युवक/युवतींना उच्च शिक्षण घेता येईल. मुक्त विद्यापीठाला पालघर जिल्ह्यात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे जिल्हा केंद्र सुरू करण्यास व्यवस्थापन मंडळाने प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर सादर...<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** आदिवासी युवक/युवतींना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी मुक्त विद्यापीठाने उचलेले योग्य पाऊल आहे. पालघर जिल्ह्याला जिल्हा केंद्र स्थापन करण्यास मा. व्यवस्थापन मंडळाने प्रशासकीय मान्यता देऊन आवश्यक ती आर्थिक तरतुद करण्याच्या सूचनेसह सर्वानुमते मान्यता दिली व या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी मा. कुलगुरूंचे अभिनंदन केले.. |
| | | वरील सर्व विषयांवर समाधानकारक चर्चा होऊन ठराव करण्यात आले. तत्पुरी मा. कुलगुरू यांनी अजून एक आनंदाची बातमी माहिती म्हणून दिली. HDFC बँकेकडे विद्यापीठाच्या ठेवी ठेवलेल्या असतात. बँकींग नियमांद्वारे CSR या स्कीमद्वारे HDFC बँकेने विद्यापीठासाठी 44 सीटर बस भेट दिली आहे. या बसचा उपयोग विद्यापीठात येणारे विद्यार्थी, शेतकरी तसेच कर्मचारी यांचेसाठी करण्यात येईल असे मा. कुलगुरूंनी सांगितले<br>मा. कुलगुरू तथा अध्यक्षांनी सर्व सन्माननीय सदस्यांना येणाऱ्या नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. मा. अध्यक्षांच्या मान्यतेने सर्व उपस्थित सदस्यांचे मा. व्यवस्थापन मंडळाचे सचिव तथा कुलसचिव यांनी आभार मानले व सभा समाप्त करण्यात आली. |

**कुलगुरू तथा अध्यक्ष**
**व्यवस्थापन मंडळ**

**कुलसचिव तथा सचिव**
**व्यवस्थापन मंडळ**